दैनिक
# महावृत्त
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

Bharat Chandak
SATYA ELECTRICALS
POLYCAB Racold legrand HAVELLS L&T SWITCHGEAR INDOASIAN
Finolex KOLORS USHA PHILIPS GreatWhite SIEMENS
Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512
Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018
Email:satyaelectricals@rediffmail.com

लातूर वर्ष ३ रे अंक १६० वा मंगळवार दि.२१ नोव्हेंबर २०२३ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

## धनगर आरक्षणासाठी जालन्यात 'महामोर्चा'



जालना : आधी मराठा आरक्षण आणि त्यानंतर ओबीसी आरक्षणावरून चर्चेत आलेल्या जालन्यात आता धनगर आरक्षणासाठी भव्य मोर्चा निघणार आहे. धनगर समाजाला अनुसूचित जमाती आरक्षणाच्या अंमलबजावणी करण्यासह अन्य प्रमुख मागण्यांसाठी समस्त धनगर समाजाच्या वतीने उद्या (२१ नोव्हेंबर) रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयावर हा मोर्चा काढण्यात येणार आहे.

जालना जिल्हा सध्या आरक्षणाच्या मागण्यांच्या केंद्रबिंदू बनला असल्याचे पाहायला मिळत आहे. आंतरवाली सराटीत मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे यांनी उपोषण सुरु केल्याने याची राज्यभरात चर्चा पाहायला मिळाली. त्यानंतर, गेल्या आठवड्यात झालेली ओबीसी सभा देखील जालन्यातील अंबडमध्ये झाली. असे असतांना आता धनगर आरक्षणाच्या मागणीसाठी देखील जालना येथील जिल्हाधिकारी कार्यालयावर उद्या भव्य असा महामोर्चा काढण्यात येणार आहे. उद्या सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयावर हा मोर्चा काढण्यात येणार आहे.

धनगर समाजाला अनुसूचित जमाती आरक्षणाच्या अंमलबजावणी करण्यासह अन्य प्रमुख मागण्यांसाठी समस्त धनगर समाजाच्या वतीने उद्या सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात येणार आहे. ज्यात, जिल्ह्यातील समस्त धनगर समाजाच्या वतीने हा मोर्चा काढण्यात येणार आहे. हा मोर्चा गांधी चमन येथून सुरू होऊन शनि मंदिर, उड्डाणपुल, नुतन वसाहत, अंबड चौफुलीमार्गे जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकणार आहे. तेथे, मोर्चाचे रूपांतर सभेत होणार असल्याचे बो-हाडे यांनी सांगितले.

पोलिसांवर सतत बंदोबस्ताचा ताण

आंतरवाली सराटी येथील उपोषणास्थळी झालेल्या लाठीचार्जच्या घटनेनंतर हे ठिकाणी मराठा आरक्षणाच्या आंदोलनाचे केंद्रस्थान बनले आहे. मुख्यमंत्री यांच्यापासून तर मंत्रीमंडळातील मंत्र्यांचे दौरे, राजकीय नेत्यांचे दौरे आणि राज्यभरातील मराठा बांधव यांची होणारी गर्दी पाहता पोलिसांकडून सतत खडा पहारा दिला जात आहे. त्यात जिल्ह्यात ठिकठिकाणी होणारे आंदोलन आणि उपोषण यांना लागणार पोलीस बंदोबस्त द्यावा लागत आहे. त्यानंतर ओबीसी सभेसाठी देखील पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. त्यात, आता धनगर आरक्षणासाठी मोर्चा निघणार आहे. त्यामुळे जालना पोलिसांवर सतत बंदोबस्ताचा ताण पाहायला मिळत आहे.

## जनतेच्या मिळणा-या पाठबळामुळे मी धन्य झालो - आ. शेखर निकम

मुंबई/ प्रतिनिधी : - चिपळूण संगमेश्वर आमदार शेखर निकम यांनी आमदार झाल्यानंतर मागील चार वर्षात केलली विकास कामे जनतेपर्यंत पोहचली की नाही तसेच मतदार संघातील उर्वरीत विकास टप्पा टप्प्याने कसा करता येईल हे आपल्या गावाप्रति प्रेम करणा-या चाकरमान्यांकडून जाणून घेण्यासाठी व योग्य मार्गदर्शन व सर्व चाकरमान्यांची सदिच्छा भेट व्हावी यासाठी जिल्हा परिषद गटाप्रमाणे मेळाव्याचे आयोजन आमदार शेखर निकम यांनी त्या त्या गटातील पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या सहकार्याने केले आहे. त्याप्रमाणे जि.प. गट ओझरे, जि.प. कडवई व मुचरी पं.स. गण याचे मुंबईस्थित चाकरमान्यांचे मेळावे अलोट गर्दीने यशस्वीरीत्या पार पडले. मात्र कालच झालेला जि.प.धामापूर तर्फे संगमेश्वर गटाचा मेळावा हा विश्व करंडक भारत व ऑस्ट्रोलिया फायनलच्या दिवशी असल्याने याला गर्दी होईल की नाही यामध्ये संभ्रम चिपळूण संगमेश्वर मतदार संघातील जनतेत होताच तेवढाच या मेळाव्यात किती लोक हजेरी लावतात याकडे सर्व विरोधकांमधील नेते पदाधिकारी व कार्यकर्ते यांचे लक्ष लागून राहिले होते. परंतु कार्यसम्राट आमदार शेखर निकम यांनी आमदार झाल्यापासून केलेली नियोजनबद्ध कामे, प्रत्येक गावातील वाडी-वस्त्यांमधील केलेला विकास तसेच धामापूर जि.प. गटात विविध योजनेंतर्गत ६९ कोटी ०४ लाख ७० हजाराचा निधी मंजूर केला आहे. शांत, संयमी स्वभावाचे असलेले शेखर सर यांच्या हाकेला हाक देत देश कि धडकन असलेला विश्व करंडक भारत व ऑस्ट्रोलिया फायनल सामना न पहाता सरळ मतदार संघातील जि.प. धामापूर तर्फे संगमेश्वर गटतील लोकांनी मेळाव्यास गर्दी करुन मेळावा यशस्वीरीत्या पार पाडला.




आमदार शेखर निकम यांनी सर्व उपस्थित लोकांचे आभार मानले. मार्गदर्शन करताना म्हणाले विश्व करंडकाची फायनल असुन सुद्धा धामापूर तर्फे संगमेश्वर जि.प. गटातील मुंबईस्थित चाकरमान्यांनी मेळाव्यास केलेली गर्दी अभिमानास्पद असून मला भविष्यातील कामगीरीला पाठबळ देणारी ठरेल. आपलं सर्वांचे प्रेम असेच वृद्धिंगत होवो. तुमच्या मिळणा-या प्रेमाने व पाठिब्यांने मी निश्चितच टिकाकारांना मतदार संघाचा विकास करत सडेतोड उत्तर देवू शकेन. आपण आप-आपसात वाद विवाद न करता पक्ष वाढीच्या दृष्टीने काम करत रहा. आपल्या गटातील उर्वरीत कामे निश्चितच पुढील काळात केली जातील असा विश्वास देतो आणि आणि आपण माझ्या हाकेला तुम्ही दाद दिलीत त्याबद्दल आपल्या सामोर नतमस्तक होतो.

यावेळी जयंत खताते, अजित यशवंतराव, बाबाजीराव जाधव, दादा साळवी, रमेश राणे, सुरेश घडशी , अबु ठसाळे, रमेश राणे, पूजा निकम, राजेंद्र सुर्वे, राजेंद्र पोमेंडकर, बाळू ढवळे, पंकज पुसाळकर, जाकीर शेकासन, सुदेश घडशी, प्रफुल्ल भुवड, अविनाश कांबळे, नितीन भोसले, मंगेश बांडागळे, बाळ पंदेरे, सरपंच प्रकाश वीर (मावळंगे), महेश बाष्ट्ये (माखजन), कृष्णा जोगळे (नारडुवे), शेखर उकार्डे (आंबव), शांताराम भायजे (धामापुर), निधी पंदेरे (वांझोळे), मुंबईस्थित प्रमुख कार्यकर्ते उमेश पवार, प्रभाकर धनावडे, अनिल मेंडे, संदिप जड्यार, प्रकाश चव्हाण, राजाराम मोरे, सिताराम बाचिम, सुनिल वेलोंडे, भुषण वीरकर, तुकाराम गोताड, शरद चव्हाण, अशोक मांडवकर, शिवाजी धनावडे, सिद्धार्थ पवार, संदिप पड्यार, भाई सावंत, अनंत गोटेकर, मोहन भुवड, वसंत भुवड, प्रथमेश मेणे, ड.मोहीते, भिमराव गमरे, अमरसेन भुवड, ज्ञानदेव पड्यार, योगेश साटले, उमेश कांबळे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

तसेच सुशिल भायजे,सुरेश घडशी, नाना कांगणे, शेखर उकार्डे, गणपत चव्हाण, अक्षय चव्हाण, मयुर बाष्ट्ये, गजानन सुर्वे, रुपेश गोताड, शशिकांत घाणेकर, बाबुकवळकर, सुबोध चव्हाण, शैलेश चव्हाण, अमित माचिवले, प्रकाश जड्यार, कृष्णा जोगळे, रमाकांत घाणेकर, लवु सुर्वे, सुभाष महाडीक, एम आर कांबळे, पांड्या पड्ये, भैया शिगवण, सिद्धार्थ पवार, अजीज आलेकर, संतोष गोटेकर, समीर लोटणकर, सुलतान कापडी, विजय जोगळे, बंड्या किंजळकर, अनंत नवरंग, सुरज जोगले यांनी व धामापुर जि.प. गटातील पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या नियोजनाने मेळावा यशस्वीरीत्या पार पडला.

## ठाकरे गटाच्या पदाधिका-यांना नोटीस



मुंबई : बाळासाहेब ठाकरेंच्या शिवाजी पार्कवरील स्मृतिस्थळावर शिवसेनेच्या शिंदे आणि ठाकरे या दोन्ही गटांमध्ये राडा झाला. पोलिसांनी आतापर्यंत याप्रकरणी ५० ते ६० जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. शिवाजी पार्कवरील राड्याप्रकरणी पोलिसांकडून ठाकरे गटाच्या पदाधिका-यांना नोटीस देण्यात आल्या आहेत. प्राथमिक चौकशीसाठी हजर राहण्याचे आदेश पोलिसांनी दिले आहेत. ठाकरे गटाचे पदाधिकारी थोड्याच वेळात शिवाजी पार्क पोलिस ठाण्यात जाणार आहेत.बाळासाहेब ठाकरेंच्या स्मृतीदिनी शिवसेनेचे दोन्ही गट एकत्र आल्यास गोंधळ होणार असा अंदाज होता. त्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी स्मृतीदिनाच्या पूर्वसंध्येला बाळासाहेब ठाकरेंच्या स्मृतीस्थळावर जात बाळासाहेब ठाकरेंना अभिवादन केले. मुख्यमंत्री अभिवादन करून बाहेर पडताच ठाकरे गटाचे अनिल देसाई आणि अनिल परब बाळासाहेब ठाकरेंना अभिवादन करण्यासाठी स्मृतीस्थळावर दाखल झाले. परब दाखल झाले आणि याच वेळी शिवसेनेच्या दोन्ही गटांमध्ये जोरदार राडा झाला.सूडबुद्धीने नोटीस पाठवल्याचा संजय राऊतांचा आरोप ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांनी शिंदे गटाच्या महिला कार्यकर्त्यांना धक्काबुक्की केल्याचा आरोप शिंदे गटानं केला आहे. स्मृतीस्थळासमोर राडा सुरू होता तेव्हा सुरू असलेला राडा थांबवण्याऐवजी दोन्ही गटातील नेते एकमेकांवर आरोपांच्या फैरी झाडत होते. संजय राऊतांनी शिंदे गटावर निशाणा साधला आहे. संजय राऊत म्हणाले, सुरुवात कोणी केली त्यांच्यावरती नोटीस कारवाई का केली नाही ?

## शेतकऱ्यांना अग्रिम रक्कम तत्काळ द्या, दुष्काळाच्या सवलती तातडीने लागू करा स्वत:ला 'गतिमान' म्हणवून घेणाऱ्या सरकारने आता 'वेगवान' निर्णय घ्यावा आमदार धिरज देशमुख यांनी काँग्रेसच्या शिष्टमंडळासह घेतली जिल्हाधिकाऱ्यांची भेट

**सर्वच प्रकल्पातील पाणीसाठा आरक्षित करू नका**

पाणीटंचाईच्या आराखड्यानुसार आवश्यक असलेल्या प्रकल्पातीलच पाणीसाठा आरक्षित करावा. सर्वच प्रकल्पातील पाणीसाठा आरक्षित केला तर पाणीसाठा वापरला जाणार नाही. पाणीसाठ्याचे बाष्पीभवनही होईल. शेतकरी बांधवानी अनेक ठिकाणी प्रकल्पातील पाण्याच्या नियोजनावर रब्बी हंगामातील पिकांची पेरणी केली असून त्यांचे पाणी बंद केले तर शेतीचे मोठे नुकसान होणार आहे. म्हणून आवश्यक त्या प्रकल्पातील आवश्यकतेइतके पाण्याचे आरक्षण करावे. जेणेकरून शेतकऱ्यांना दिलासा मिळेल, अशी मागणी आमदार श्री. धिरज देशमुख यांनी केली. तसेच, दुष्काळामुळे जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर होणार आहे. याबाबतही योग्य त्या उपाययोजना आखल्या जाव्यात. याकडेही त्यांनी लक्ष वेधले.







लातूर : स्वतःला 'गतिमान' म्हणवून घेणाऱ्या राज्य सरकारने शेतकरी बांधवांना गणेशोत्सव, गौरी, दसरा, दिवाळी या सणांमध्ये पीकविम्याची अग्रिम रक्कम मिळवून दिली नाही. त्यामुळे शेतकरी बांधवांना सण साधेपणाने करावे लागले. जाहीर झालेली मदत वेळेवर मिळत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. म्हणून आतातरी 'वेगवान' हालचाली करून अग्रिम रक्कम सरकारने शेतकऱ्यांना मिळवून द्यावी, अशी मागणी 'लातूर ग्रामीण'चे आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी केली. सरसकट दुष्काळाच्या सवलती तातडीने लातूर जिल्ह्यात लागू कराव्यात, असेही ते म्हणाले. दिवाळीआधी पीकविमा भरपाईच्या २५ टक्के रक्कम अग्रीम मिळायला हवी होती. दिवाळी उलटून आठवडा होत आला तरी ही रक्कम लातूर जिल्ह्यात अद्याप मिळाली नाही. याबरोबरच, दुष्काळ जाहीर झाला असला तरी त्याच्या सवलती शेतकरी व सर्वसामान्यांसाठी लागू झाल्या नाहीत. या पार्श्वभूमीवर, लातूर ग्रामीण'चे आमदार श्री. धिरज देशमुख यांनी काँग्रेसच्या शिष्टमंडळासह जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांची सोमवारी (ता. २०) भेट घेवून त्यांना निवेदन दिले. आमदार श्री. धिरज देशमुख म्हणाले, यंदा लातूरसह राज्याच्या अनेक भागांत पावसाने पाठ फिरवली. त्यामुळे सोयाबीन व अन्य पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. रब्बीसुद्धा संकटात सापडली आहे. अशा अडचणीच्या काळात 'गतिमान' म्हणवून घेणाऱ्या सरकारने शेतकरी बांधवांना तत्काळ अग्रिम रक्कम दिली असती तर ही दिवाळी बळीराजाला अधिक आनंदात साजरी करता आली असती. आता तरी 'वेगवान' हालचाली करीत सरकारने शेतकरी बांधवांना अग्रिम रक्कम मिळवून द्यावी. यासोबतच सरसकट दुष्काळाच्या सवलती ताडतीने लातूर जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिकांना, शेतकऱ्यांना द्याव्यात, अशी आमची मागणी आहे.

कोट : काँग्रेस पक्ष कायमच शेतकऱ्यांच्या, सर्वसामान्यांच्या पाठीशी उभा राहणारा पक्ष आहे. या अडचणीच्या काळातही आम्ही ठामपणे शेतकऱ्यांच्या, सर्वसामान्यांच्या सोबत आहोत. त्यांना दिलासा मिळाल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही.
- श्री. धिरज देशमुख, आमदार, लातूर ग्रामीण

## संपादकीय....

# हे राज्य पेटावे ही यांची इच्छा?

अधिकृतपणे असे म्हणायचे कारण सध्या भुजबळ यांच्यामागे भाजपचे अनधिकृत बळ नाही, असे कोणी ठामपणे म्हणत नाही. मराठयांचे आंदोलन चिघळण्यामागे कोणाचा हात आहे हा प्रश्न जसा विचारला जातो तितक्याच जोमदारपणे ओबीसींना चिथावण्यात कोणास रस आहे, हा प्रश्नही विचारणे आवश्यक आहे.मराठा–'ओबीसी' आरक्षणाच्या निमित्ताने छगन भुजबळ यांच्यातील फक्त वक्ताच जागा झाला असता तर त्याची इतकी दखल घेण्याचे कारण नव्हते. भुजबळ यांचे भाषण म्हणजे एकपात्री प्रयोग असतो. या वेळी अनेक पात्रांचा समाचार घ्यावयाचा असल्याने त्यांचा हा प्रयोग चांगलाच रंगला. हे सर्व मनोरंजनापुरतेच मर्यादित राहिले असते आणि राहणार असते तर त्यांच्यातील वक्तादशसहस्रेषुविषयी चार बरे शब्द बोलता आले असते. तथापि सद्य परिस्थितीत तसे करणे ही कर्तव्यच्युती ठरेल. तेव्हा भुजबळांच्या भाषणातील फोले पाखडण्याची चर्चा होत असली तरी त्यातील सत्त्व निवडून त्यावर भाष्य करणे आवश्यक ठरते. या संदर्भात पहिला मुद्दा म्हणजे भुजबळ हे भाजप–शिवसेना–राष्ट्रवादी मंत्रिमंडळातील ज्येष्ठ सदस्य आहेत. आपल्या भाषणात त्यांनी मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांविषयी काही अनुदार उद्गार काढले. या मंत्र्यांच्या लवलवत्या कंबरेबाबत त्यांनी भाष्य केले. तेव्हा मुद्दा असा की मंत्रिमंडळाच्या बैठकीत त्यांनी कधी या मुद्दय़ांवर आक्षेप घेतला होता काय? तसा कधी प्रयत्न त्यांनी केला होता काय? तसे करण्यापासून त्यांना कोणी रोखले होते काय? रोखले असल्यास त्यावर भुजबळ यांची प्रतिक्रिया काय होती? आणि रोखले नव्हते तर भुजबळ या बैठकांत कंबरा लवलवायची सवय झालेल्या मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांबाबत कधी काय म्हणाले होते? ताज्या सभेत भुजबळ यांनी आपल्या ओबीसी बांधवांस अप्रत्यक्षपणे कायदा हाती घेण्याचा सल्ला दिला. एखाद्या मंत्र्याने असे करणे कितपत योग्य? भुजबळ यांच्या चिथावणीप्रमाणे उद्या खरोखरच मराठा आणि ओबीसी संघर्ष रस्त्यावर सुरू झाला तर त्यात भुजबळादी नेते आपल्या मंत्रीपदाच्या शासकीय इतमामात सुरक्षित राहतील. पण ज्या अश्रापांची डोकी विनाकारण फुटतील; त्यांचे काय? रिकाम्या हातांशी स्पर्धा करणारी डोकी भडकावणे नेहमीच सोपे असते. सध्या महाराष्ट्रात तर अशा रिकाम्या हातांच्या फौजा गावोगाव भणंगपणा करीत आपापल्या जातीजमातीच्या नेत्यांच्या आसपास घोंघावत असतात. फुकाच्या गंडाने फुगलेले हे वीर एकमेकांस उद्या खरोखरच भिडले तर राज्यात शिमग्याची साथ पसरण्यास जराही वेळ लागणार नाही. भुजबळ यांस हे हवे आहे काय? या प्रश्नाचे उत्तर अधिकृतपणे होकारार्थी असणे शक्य नाही. पण अनधिकृतपणे जरी ते त्याच्या जवळपास जाणारे असेल तर त्यांनी एक करावे.सत्तात्याग करून 'ओबीसी' नेतृत्वाची मशाल हाती घ्यावी. तसे केल्याचे दोन फायदे सरळ दिसतात. एक म्हणजे ते राज्यातील समस्त 'ओबीसीं'चे नेता ठरतील. गेली काही वर्षे त्यांच्या नेतृत्वावर माळीपणाच्या ज्या काही मर्यादा होत्या त्या त्यांस दूर सारता येतील. यांच्या निधनानंतर या समाजास राज्यस्तरीय नेता नाही. जे काही आहेत ते कितीही टाचा वर करकरून उभे राहिले तरी त्यांची उंची काही वाढणारी नाही. तेव्हा भुजबळ यांस ही मोठी संधी आहे. आणि दुसरे म्हणजे असे केल्यास भाजप अधिकृतपणे भुजबळांस जवळ करू शकेल. अधिकृतपणे असे म्हणायचे कारण सध्या भुजबळ यांच्यामागे भाजपचे अनधिकृत बळ नाही, असे कोणी ठामपणे म्हणत नाही. त्यांचे ताजे वीरश्रीयुक्त भाषण ज्या मेळाव्यात गाजले त्याच्या आयोजनाचा भार कोणत्या पक्षातील 'देशमुख', 'पाटील' आदींनी कसा उचलला वगैरेंची चर्चा भाजपने औपचारिक पाठिंबा दिल्यास होणार नाही. तसेही भाजपस तगडय़ा ओबीसी नेत्यांची गरज आहे. मुंडे यांचा वारसा सांगणाऱ्या अद्याप तरी त्या पक्षात असल्या तरी त्यांचे काय करायचे हे भाजपचे ठरत नाही आणि आपण काय करायचे हे मुंडे वारसांचे ठरताना दिसत नाही. आणि तसेही मुंडे यांचे भाजपेतर वारस, म्हणजे यांना जे काही मिळत आहे त्यापेक्षा अधिक काही मिळण्याची फारशी संधी नाही. तेव्हा भुजबळ यांनी ही वेळ साधण्याची हिंमत दाखवायला हवी. म्हणजे एक पाय सरकारात आणि दुसरा विरोधी पक्षात असे जे काही त्यांचे सुरू आहे तसे करणे त्यांस बंद करावे लागेल. मंत्रिमंडळातही राहायचे आणि त्याच सरकारच्या धोरणावर दुगाण्या झाडायच्या हा दुटप्पीपणा झाला. तो त्यांना सोडावा लागेल. तथापि असे होण्याची शक्यता कमीच.याचे कारण असे की ओबीसींसाठी मोठया संघर्षांचे चित्र रंगवणारे भुजबळ असोत की मराठा आरक्षणावरून आगलावी भाषणे करणारे कोणी नवथर नायक असोत. यांनी कितीही आदळआपट केली तरी त्यामुळे काहीही साध्य होणारे नाही ही काळय़ा दगडावरची रेघ. कोणी कितीही उपोषणे केली, जलपानत्यागाच्या वल्गना केल्या तरी त्यामुळे जसे मराठयांस आरक्षण मिळणारे नाही आणि आपल्या आरक्षणात वाटेकरी वाढणार असा कितीही कांगावा 'ओबीसीं'नी केला तरी तसे होणारे नाही. मराठयांस आरक्षण द्यावयाचे असेल तर ते दिल्लीश्वरांस मनावर घ्यावे लागेल आणि अशा आरक्षणाचे संभाव्य राजकीय लाभ पदरात पडण्याची हमी जोपर्यंत त्यांस दिसत नाही तोपर्यंत ते काहीही करणार नाहीत. अशा हमीची गरज या दिल्लीश्वरांस २०२४ साली पहिल्या तिमाहीतच लागेल. त्या वेळी सार्वत्रिक निवडणुकांच्या तोंडावर मराठा आरक्षणासाठी अध्यादेश काढण्याचा वा संसद अधिवेशनात आरक्षणाची मर्यादा सरसकट वाढवण्याचा प्रयत्न निश्चितच होईल, असे भाकीत शेंबडे पोरही करू शकेल. तेव्हा त्या वेळच्या संभाव्य श्रेयवादाच्या पोळीवर (या शब्दाचा घास घेता येत नसेल त्यांनी पोळीच्या जागी चपाती असे वाचावे) वाढल्या जाणाऱ्या तुपाचा एखादा चमचा आपल्या ताटातही पडावा यासाठी हे आताचे नाटक सुरू आहे. हे जेव्हा घडेल तेव्हा 'ओबीसीं'च्या तोंडातील घासात वाटेकरी निर्माण केले जातील, असे मानणे राजकीय बावळटपणाचे ठरेल. स्वत:च्या पायावर धोंडा पाडण्याचा मूर्खपणा कोणीही करणार नाही. हे सर्व हे आंदोलनजीवी वा त्यांचे सूत्रधार जाणत नाहीत असे अजिबात नाही. तरीही सध्या डोकी भडकावण्याचे प्रयत्न सुरू आहेत. हे संतापजनक आहे. त्यामुळे मराठयांचे आंदोलन चिघळण्यामागे कोणाचा हात आहे हा प्रश्न जसा विचारला जातो तितक्याच जोमदारपणे ओबीसींना चिथावण्यात कोणास रस आहे, हा प्रश्नही विचारणे आवश्यक आहे. सध्याच्या राज्याच्या 'त्रिकोणी' सरकारातील एका कोनास या दोन्ही संघर्षांत रस असल्याचे आढळल्यास अजिबात आश्चर्य वाटू नये असे आपले सध्याचे राजकारण. ते राजकारणाच्या मर्यादेत सुरू होते तोपर्यंत त्याबाबत खंत व्यक्त करण्याची गरज नव्हती. सर्व समाजाचाच स्तर खालावला असेल तर अशा समाजातील राजकारण मूल्याधारित असावे अशी अपेक्षा करणे मूर्खपणाचे. पण हे राजकारण जेव्हा परस्परातील मतभेदांस विद्वेषाची मर्यादा ओलांडून वातावरण अधिक तापवू पाहते तेव्हा धोक्याची घंटा वाजवणे ही समाजातील शहाण्यांची जबाबदारी असते.

# बहुजनांनो आता तरी एक व्हा!.



जो ओबीसी की बात करेगा वही देश पर राज करेगा.हि मनुवाद्याची चलाखी आहे. ती आपण ओळखावी.हमे इसको अब बदलना है.ऐसा जो ओबीसी की बात करेगा वही ओबीसी देश पर राज करेगा.

आपण भारतीय मूलनिवासी ८५ टक्के आहोत.परंतु अजूनही आपल्याला स्वातंत्र्य मिळालेले नाही.हे स्वातंत्र्य आहे ते फक्त मनुवाद्यांना मिळालेले आहे.आपल्या बहुजनांना याचा काहीच फायदा झाला नाही. कारण आपल्या बहुजनांना खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य मिळालेच नाही,ते फक्त हस्तांतर झालेले आहे.गोरे इंग्रज गेले आणि काळे मनुवादी आले. एवढाच तो काय फरक झालेला आहे.बहुजनांचे आजही शोषण,अपमान,अन्याय,अत्याचार अजूनही चालूच आहे मग आपण याला स्वातंत्र्य म्हणणार काय.उत्तर आहे नाहीच.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्वप्न होते की भारतामध्ये एक वेळ अशी येईल कि येथे बहुजनांचे शासन राहील. त्यांची हि दूरदृष्टी आता सत्यात उतरत आहे.म्हणून बहुजनांनो आपण ८५% आहोत. एकत्र या आणि सत्ता आपल्या हातात घ्या. आपणच आपला विकास करू शकतो हे सिद्ध करून द्या.बहुजन देशाचे शासक बनू शकतात,फक्त अट आहे की त्यांनी झाडून एक व्हावे. आता गुलामीच्या बेड्या तोडा.स्वतंत्र व्हा. एक व्हा.एवढीच ही एक अट आहे.आम्ही चार भाऊ SC,ST,OBC व MINORITIES.पण आपल्या दुफळीचा फायदा आहे मनुवादी विचारसरणीचे लोक घेत आहेत. हे आता बहुजनांना चांगलेच समजलेले आहे.

आपापल्या पक्षाचे जोखड झुगारून द्या.एका विचार मंचावर या.जनता अशा घटनेची आतुरतेने वाट पाहत आहे.सर्वांचा विचार एक आहेत,उद्देश एक आहे.आता बहुजनांनी एकत्र येऊन सत्ता हस्तगत केली पाहिजे.

बहुजनांचे राज्य आल्यानंतर सर्वांना समान संधी मिळेल.कोणी लहान किंवा कोणी मोठा असणार नाही. आपण सारे भारतीय बांधव आहोत या उद्देशाने बहुजन शासक बनतील व सम्राट अशोका सारखा भारत निर्माण करतील. कोणीही उपाशी,बेघर,बेकार राहणार नाही याची काळजी हे बहुजन सरकार घेईल.

डॉ.बाबासाहेबांना ही एक अमूल्य भेट द्या. बहुजनांचे सरकार बनवा. बाबासाहेब आपल्याला पहात आहेत. बहुजनांचे राज्य आल्यावर ते फार खुश होतील. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे जरी शरीराने आपल्यात नसतील तरी त्यांचा तसेच सर्व महापुरुषांचा विचार आपल्या सर्वांच्या सोबत आहेच.चला तर मग बहुजनांनो एक व्हा. सर्वांनी मिळून एक पक्ष बनवा व निवडणूक लढवा. येणारे पाचशे वर्षे बहुजन हा शासक राहील याबद्दल काही दुमत नाही.

बहुजनांचे महापुरुष छत्रपती शिवाजी महाराज,महात्मा ज्योतिबा फुले,राजश्री शाहू महाराज, संत तुकाराम,संत गाडगेबाबा,रामास्वामी पेरियार नायकर,डॉ.बाबासाहेब आंबेडकर इ. महापुरुषांनी त्याबद्दल आपले विचार व्यक्त केलेले आहेत.एवढेच नव्हे तर इतिहासानी हे सिद्ध करून दिलेले आहे,जर एकत्र आले तर काहीही होऊ शकते.जनता बहुजनांनी एकत्र येण्याची व बहुजनाने शासक बनवण्याची आतुरतेने वाट पाहत आहेत त्यांना निराश करू नका.

---------------------------

महादेव डांबरे,छत्रपती संभाजी नगर ९६६५० ४७१५३.

# संविधान जागृती करणाराच राष्ट्रप्रेमी

हल्ली राष्ट्र प्रेमीची व्याख्याच बदलून गेली आहे. काही गोष्टींचा आणि देशाचा, देशातील सर्व सामान्य लोकांचा काहीच फायदा नसुन तो जबरदस्ती संबंध देशाशी , देशातील जनतेशी जोडून राष्ट्रप्रेम दाखवले जाते. लोकांना तसे भावनिक केले जाते. परंतु ज्यांचा प्रत्यक्ष संबंध देश व देशाच्या सर्वसामान्य नागरीकांशी असून प्रत्येक भारतीयांना मान सन्मान स्वाभिमान व सामाजिक संस्कार घालणाऱ्या अनेक बाबी जाणीव पुर्वक दुर्लक्षित केल्या जाते ही खुप मोठी शोकांतिका आहे. त्यापैकी च एक सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे भारतीय संविधान. भारतीय संविधान हे सर्वोच्च असून संविधानानुसार च देशाचा कारभार चालत असतो. संविधानाचा सन्मान करने हेच सर्वात मोठे राष्ट्रप्रेम आहे. ज्या संविधानाने माणसाला माणसात आणुन सर्व हक्क अधिकार बहाल करून, विषमता व भेदभाव नष्ट करून प्रत्येकाला भारतीय बनवले. तेच संविधान राष्ट्रीय ग्रंथ आहे. व त्याच संविधानाचा सन्मान करणे आणि संविधाना विषयी जागृती करणे यालाच राष्ट्र सन्मान व राष्ट्रभक्ती म्हणतात. परंतु देशातील एक कटू सत्य आहे की बहुतांश लोकांनी भारतीय संविधान वाचलेच नाही, काही खुप लोकांनी संविधान बघितलेही नाही. अशा लोकांना राष्ट्रप्रेमी म्हणणे म्हणजे निव्वळ मुर्खपणा होय. विषमतेच्या घाणीत फसलेल्या आणि तीच घाण चांगली वाटणाऱ्या लोकांना राष्ट्रप्रेमी बोलणे म्हणजे स्वतः च केलेला राष्ट्रद्रोह होय. ह्या गोष्टी समजून घेणे आवश्यक आहे. अनेक धर्मांध, जातीवादी लोकांना आजही वाटत असेल संविधान एकाच जातीसाठी आहे, संविधान बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहले म्हणून वाचायचे कशाला? घरात आणायचे कशाला अशी बुद्धीहीन लोकांना माणूस म्हणणेही गुन्हाच आहे. संविधान निर्मात्याची बुद्धीमत्ता, विद्वता, ज्ञान व कार्य न बघता केवळ जात बघून संविधान आणि बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर समजून न घेता केवळ जातीमुळे दुर करत असतील तर हा देशद्रोह आहे. देशद्रोही लोकांना राष्ट्रप्रेमी म्हणणे म्हणजे केवळ मुर्खपणा होय. कोणालाही राष्ट्रप्रेमी म्हणायचे असेल तर सर्वात अगोदर त्याला भारतीय संविधान व संविधानाचे शिल्पकार बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा सन्मान करावाच लागणार आहे. हे बंधनच आहे. जसे आपण ज्या घरात राहतो त्या घरात बाप हा आपल्या पेक्षा श्रेष्ठ असतो. बापाचे मत ऐकणे, बापाने दिलेले संस्कार स्विकारणे हे लेकराचे काम असते. बापाच्या घरात राहून कोणी अस म्हणत असेल की मी बापाला मानतो तर याचा अर्थ काय? हे समजून घेणे आवश्यक आहे. संविधानाने सामाजिक संस्कारासह हक्क अधिकार बहाल करून त्याचे संरक्षण केले, मानसाला मान सन्मान मिळवून दिला तरी स्वतः ला बुद्धीमान समजणारे, गुणवंत समजणारे लोक संविधानाच्या ज्ञाना विषयी एवढे माघास आहेत की त्यांच्या बुद्धीची किव येते. अशा लोकांचा बौद्धिक विकास होईल की नाही याची शंका मनात येते. कारण समता, बंधुता, हक्क न्याय बहाल करून संरक्षण करणारे आणि देशातील विविधतेला एकतेमध्ये बंदिस्त करणारे सर्वोच्च संविधान यांना माहिती नसते. परंतु विषमता, पाखंड, अन्याय, माणसिक गुलामी निर्माण करणारे ग्रंथ साहित्याचे हे मोठ्या रुबाबात उदाहरण देतात तेव्हाच लक्षात येते यांना देश महत्त्वाचा नाही, देशातील सुखी समाधानी जनता महत्वाची नाही तर यांना हजारो वर्षांपासून चालत आलेली गुलामगिरी व बौद्धिक लाचारी मान्य आहे. म्हणून अशा विचार सरणीच्या लोकांना राष्ट्रप्रेमी अजिबात समजता कामा नये. संविधान राष्ट्रीय ग्रंथ आहे म्हणून त्याचा सन्मान व्हायलाच पाहिजे परंतु संविधानामुळे वैयक्तिक प्रगती होऊन वैयक्तिक मानसन्मान मिळाला याची जाणीव म्हणून वैयक्तिक पातळीवर संविधाना विषयी जाणीव पाहिजे. संविधाना पुर्वीची सर्व सामान्य माणसाचे जिवन निव्वळ पशू प्रमाणे होते व जाती व्यवस्थेने हिन लेखुन अपमानास्पद वागणूक दिलेली होती. ज्याला स्वतः च्या खानदानाचा इतिहास माहिती नाही त्यांना संविधान कळणार नाही. म्हणजे संविधान कळण्यासाठी आपल्याला आपल्या पुर्वजांनी जगलेले आयुष्य लक्षात घेणे महत्वाचे आहे. महात्मा फुले यांना वराती मधुन बाहेर काढणे असो, छत्रपती शिवाजी महाराज यांचा राज्यभिषेक नाकारला जाणे असो, शाहु महाराज वेदोक्त प्रकरण असो, तुकाराम महाराजांचा मृत्यू असो, गाथा इंद्रायणी मध्ये बुडवणे असो, असे उदाहरणे प्रामाणिक पणे बघितले तर लक्षात येईल जेथे राजे, संत आणि वैचारिक महापुरुष यांना जातीमुळे छळले गेले. एवढेच नव्हे तर संविधाना अगोदर मानसाला एवढी हिन वागणूक मिळायची की नाव तर बरोबर घ्यायचे नाही परंतु द्वेषात्मक घेतलेल्या नावामागे जात लाऊन बोलायचे. तुक्या, सक्या, दगड्या, कचऱ्या, धोंड्या, किसन्या असे नाव उच्चारून त्यांच्या समोर कुंभार, माळी, साळी, तेली, कुणबी, धनगर, मांग, चांभार अशी जात लावली जायची. आजही घरातील वंशवाळ बघितली तर असेच दिसते. आणि असे जेथे दिसते त्या कुळाचा उद्धार बोधीसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून केला हे लक्षात ठेवणे गरजेचे आहे. आता नावा समोर जात लाऊन हिनवले जात नाही. आडनाव लाऊन सन्मान केला जातो. ज्या संविधानाने मान सन्मान स्वाभिमान दिला, शिक्षण रोजगार सुविधा दिली, अनेक अधिकार दिले, जनतेला राजा बनवले याची जाणीव ज्यांना नसेल त्यांना राष्ट्रप्रेमी म्हणायचे कसे? राष्ट्रप्रेमी होण्यासाठी राष्ट्राचा अर्थ समजून राष्ट्राचा व राष्ट्रीय संपतीचा सन्मान तर करता आला पाहिजे. संविधान केवळ देश चालण्याचे पुस्तक नाही. करोडो कुळांचा उद्धार करण्याचा एकमेव महामार्ग आहे. नोकरी, शिक्षण, आरक्षण, हक्क अधिकार हे सर्व संविधानाने दिलेले आहे. संविधाना पुर्वी तर शाळा शिकणेही पाप समजले जायचे म्हणून तर शाळा नव्हत्या. ब्रिटिशांनी शाळा सुरू करून दिल्या आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रत्येकाला शिक्षणाचा अधिकार दिला. संविधानाने दिलेले हक्क अधिकार व सुख सुविधेचा फायदा घेऊनही संविधाना बद्दल अज्ञानी असणाऱ्या लोकांना राष्ट्रप्रेमी कसे म्हणता येऊ शकते. जेव्हा संविधानाचे उल्लंघन होते तेव्हा एकही शब्द न बोलणाऱ्यांना राष्ट्रप्रेमाचे प्रमाणपत्र कोण देते? देशाचा विचार सोडून द्या महाराष्ट्रात ५२५ पेक्षा जास्त जातींना आरक्षण असुन जेव्हा आरक्षणाचा मुद्दा येतो तेव्हा एकाच जातीकडे बघून आरक्षणा विषयी चुकीची मांडणी करणाऱ्यांना आणि आरक्षणामुळे गुणवंत विद्यार्थ्यांना संधी मिळत नाही जेव्हा असे बिनबुडाचे उदाहरणे दिली जातात तेव्हाही एकच जात समोर येते बाकीच्या ५२५ पेक्षा जास्त जातींना काहीच वाटत नसेल तर ही बौद्धिक मागासले पण आहेच परंतु संविधानाने दिलेल्या आरक्षणावर चुकीचे बोलणारा आणि आरक्षण घेऊन गप्प बसणाऱ्यांना राष्ट्रप्रेमी कस कोणत्या आधारावर म्हणता येईल? जे लोक संविधानाचे वाचन करत नाहीत, संविधान घरात आणत नाहीत, संविधान घरात आणायची लाज वाटते अशा लोकांना देशद्रोही म्हणावे की राष्ट्रप्रेमी? संविधाना बद्दल जागृत होऊन संविधानाचा प्रचार आणि प्रसार करतो तोच खरा राष्ट्रप्रेमी. २६ नोव्हेंबर, २६ जानेवारी जवळ येताना किमान एक सप्ताह तरी जो कोणी संविधाना विषयी तन मन धनाने प्रचार आणि प्रसार करतो तो खरा राष्ट्रप्रेमी. बोलण्यातून, वागण्यातून दररोज संविधानाचा सन्मान व प्रचार व्हायला च पाहिजे तोच खरा भारतीय व तोच खरा राष्ट्रप्रेमी. परंपरा अनेकांना २६ नोव्हेंबर आला काय गेला काय काही घेण देण नसते. बरेच जन २६ जानेवारी ला केवळ सुट्टी चा दिवस म्हणून इंजॉय करतात. काही काही बौद्धिक दारीद्र्यात फसलेले लोक २६ जानेवारी हा दिवस प्रजासत्ताक दिवस म्हणून ध्वजारोहण करून साजरा करतात परंतु भारतीय संविधान व बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाचा उल्लेख ही करत नाहीत. अशा बौद्धिक, मानसिक दारिद्र्यात जाणीव पुर्वक फसलेल्या लोकांना राष्ट्रप्रेमी समजने म्हणजेच राष्ट्रद्रोह होय. राष्ट्रप्रेमी कोणाला म्हणायचे, खरा भारतीय कोण कसा ओळखायचा तर सार्वजनिक जिवन जगताना जात धर्म पंथ लिंग याचा विचार न करता संविधाना नुसार वागतो, ज्याला संविधान, संविधानाने दिलेले मुल्य, व संविधानाचे शिल्पकार यांच्या बद्दल व राष्ट्रीय संपती आणि राष्ट्रीय प्रतिकांबद्दल आदर आहे. तोच खरा भारतीय व तोच राष्ट्रप्रेमी होय. ज्या बाबींचा देश व देशातील सार्वजनिक संस्थेशी काहीच संबध नसताना जबरदस्ती जोडणे व मुळ मुळ भारतीय अभिमानाच्या बाबींना बाजूला सारणे केवळ बौद्धिक मागासलेपणा होय.

----------

विनोद पंजाबराव सदावर्ते
समाज एकता अभियान
रा. आरेगांव ता मेहकर
मोबा: ९१३०९७९३००

## चुकीच्या पद्धतीने फळे खाणे ठरू शकते धोकादायक? फळे खाताना लक्षात ठेवा तज्ज्ञांनी सांगितलेल्या ‘या’ गोष्टी



एकाच वेळी वेगवेगळी फळे खाणे योग्य की अयोग्य? त्याचा शरीरावर नेमका काय परिणाम होतो? तज्ज्ञ सांगतात आपल्यापैकी अनेकांना फळे खायला आवडतात. फळे आवडत नाहीत, अशी व्यक्ती शोधून सापडणे कठीण आहे. फळे आपल्या शरीरासाठीही खूप फायदेशीर आहेत. त्यामुळे लोक रोज फळे खाणे पसंत करतात. पण तुम्ही कधी विचार केला आहे का की, फळे खाण्याचीही एक पद्धत असते. विशेषतः जेव्हा तुम्ही आजारी पडता किंवा हिवाळ्याच्या ऋतूमध्ये फळे खाण्याचे काही नियम असतात. त्यामुळे आपण नेमकी कोणती फळे, कोणत्या वेळी खावीत आणि ती खाताना काय काळजी घ्यावी याबाबतची माहिती जाणून घेऊ.आयुर्वेद अभ्यासक निधी पंड्या यांनी त्यांच्या इन्स्टाग्राम पोस्टमध्ये लिहिले आहे, तुम्हाला फळं आवडतात का? आवडत असतील; परंतु माझ्यापेक्षा जास्त नाही. कारण– मला खूप फळं आवडतात. परंतु, मागील १० वर्षांत मी फळं खाण्याच्या पद्धतीमध्ये बदल केला; ज्यामुळे माझं शरीर पूर्णपणे बदललं आहे. निधी सांगतात की, फळं खाण्याचेही काही नियम आहेत. निधी यांनी फळे खाण्याच्या बाबतीत सांगितलेले काही नियम एकाच वेळी विविध फळे जास्त प्रमाणात खाऊ नका. प्रत्येक फळामध्ये वेगवेगळे गुणधर्म असतात. तसेच एकाच वेळी एक किंवा दोन समान गुणधर्म असलेली फळे खा.

फळे लवकर खराब होतात. त्यामुळे ती खराब होण्याआधी खा.सकाळी १०.३० ते दुपारी ३.३० च्या दरम्यान फळे खा; तसेच नाश्त्याला फळे खाऊ नका.सर्व फळे सारखी नसतात. त्यामुळे ती खूप काळजीपूर्वक निवडा. तांदूळ आणि गहू यांच्या पौष्टिक सामग्रीमध्ये जेवढा फरक असतो, तेवढाच फरक दोन फळांमध्ये असतो.सर्वांत महत्त्वाचे म्हणजे आजारी असताना फळे खाऊ नये. विशेषतः ताप किंवा सर्दीमध्ये फळे खाणे टाळण्याचा सल्ला निधी यांनी दिला आहे. परंतु, डाळिंब मात्र कोणीही, कधीही खाऊ शकते. जरी तुम्ही आजारी असाल तरीही डाळिंब खाऊ शकता.जेवणादरम्यान फळे खाणे योग्य की अयोग्य? जेवणादरम्यान फळे खाणं कधीही चांगलं असतं. कारण– ती चांगलं पोषण शोषण्यास मदत करतात, असं पवित्रा एन. राज (मुख्य आहारतज्ज्ञ, मणिपाल हॉस्पिटल, यशवंतपूर, बंगळुरू) यांनी सांगितलं, तर त्या पुढे सांगतात की, फळांमध्ये चांगल्या प्रमाणात फायबर असते. त्यामुळे ती जेवणादरम्यान खाण्याचा सल्ला दिला जातो; जेवणाबरोबर एकत्रित खाण्याचा सल्ला दिला जात नाही.पुढील प्रकारची फळे कधीही एकत्र खाऊ नयेत :तुरट फळे : सफरचंद, बेरी, चेरी व नासपती.गोड फळे : पपई, आंबा, केळी, पीच व अ‍ॅव्होकॅडो आंबट फळे : संत्री, लिंबू व द्राक्षे तसेच तज्ज्ञांच्या मते, फळं एकत्र केल्यानं काही पचन आणि पोट फुगण्याशी संबंधित समस्या उद्‌भवू शकतात. त्यामुळे एकाच वेळी एक फळ खाणं केव्हाही चांगलं असतं. कारण– प्रत्येक फळाचे गुणधर्म वेगळे असतात. जसे की, काही लिंबूवर्गीय असतात, काही कार्बोहायड्रेट्सयुक्त असतात आणि काही व्हिटॅमिन व पोटॅशियमयुक्त असतात, असेही पवित्रा सांगतात.

## पित्ताशयातील खडे



आपल्या देशातील १३२ कोटी लोकसंख्येच्या १५% व्यक्तींना त्यांच्या आयुष्यात पित्ताशयामध्ये खडे होतात. भारतातील विविध प्रदेशात खाण्याच्या पद्धती, राहणीमान व हवामान वेगळे असल्याने होणारे आजारही वेगळे असतात. याचेच उदाहरण म्हणजे पित्ताशयातील खडे. उत्तर भारतात – पंजाब दिल्ली उत्तर प्रदेश व बिहार येथे खडयाचे प्रमाण खूप जास्त आहे तर दक्षिण भारतात ते त्या मानाने कमी असते. हल्ली बऱ्याचदा असे रुग्ण येतात कि त्यांनी इतर कारणासाठी पोटाची सोनोग्राफी केली असते व त्यांच्या पित्ताशयामध्ये खडे आहेत असे आढळून येते. आपल्या देशातील १३२ कोटी लोकसंख्येच्या १५% व्यक्तींना त्यांच्या आयुष्यात पित्ताशयामध्ये खडे होतात. परंतु चांगली गोष्ट म्हणजे त्यातील फक्त २–३ टक्केच व्यक्तींना त्याचा जास्त त्रास होतो.आहारात स्निग्ध पदार्थांचे प्रमाण (जळश्रू षेव) जास्त झालं किंवा तंतूमय पदार्थांचं (षळलीश) प्रमाण कमी झालं तर पित्तरसाची घनता वाढते व पित्ताशयात छोटे छोटे खडे तयार होतात. हे खडे तीन प्रकारचे असतात १. कोलेस्ट्रॉल (उहेश्रशींीशीश्र) २. ळिसाशपीं (बिलीरुबीनचे घटक) ३. मिश्र. ७०– ८० टक्के रुग्णामध्ये ते मिश्र प्रकारचे असतात. अगदी लहान खडे पित्तनलिकेवाटे पित्तरसाबरोबर लहान आतडयात निघून जातात. पण जर त्यांचा आकार मोठा असेल तर ते पित्ताशयाच्या व पित्तनलिकेच्या अरुंद ठिकाणी अडकून राहतात व पित्ताशयाला सूज येऊन जंतूचा प्रादूर्भाव होतो.

## ७२ तास फक्त फळे खाल्ल्यास शरीरावर काय परिणाम होऊ शकतो? वाचा डॉक्टर काय सांगतात

७२ तास फक्त फळे खाऊन खरचं काही फायदा होतो का याविषयी डॉक्टरांनी सविस्तर माहिती दिली आहे. खराब जीवनशैली आणि खाण्यापिण्याच्या चुकीच्या सवयींमुळे हल्ली लठ्ठपणाची समस्या वाढताना दिसतेय. त्यासोबतच अनेक आजारही वाढत आहेत यामुळे लठ्ठपणा कमी करण्यासाठी अनेक जण डिटॉक्स डाएटचा पर्याय निवडत आहेत. त्यात अनेक जण फक्त फळे खाऊन वजन कमी करण्याचा प्रयत्न करतात. पण, ७२ तास फक्त फळे खाऊन शरीरावर काय परिणाम होतात तुम्हाला माहित आहे का? याविषयी द इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना गुरुग्राममधील नारायणा सुपरस्पेशालिटी हॉस्पिटलमधील अंतर्गत औषध विभागाचे वरिष्ठ सल्लागार डॉ. पंकज वर्मा यांनी सविस्तर माहिती दिली आहे.तीन दिवस आहारात फक्त फळांचा समावेश करणे याला ‘फ्रुटेरियन डाएट’ म्हटले जाते. अशा प्रकारचा आहार जीवनसत्त्वे, खनिजे व अँटिऑक्सिडंट्सयुक्त वाटू शकतो. पण खरेच या आहारामुळे आपल्याला विविध फायदे मिळतात? याच मुद्द्यावर मेडिटेशनबायनेचर इन्स्टाग्राम अकाउंटवरून एक पोस्ट करण्यात आली आहे; ज्यात तीन दिवस फळांवर राहिल्याने काय होऊ शकते याबद्दलची माहिती दिली आहे. १) पोस्टनुसार फळांचा आहार सेवन केल्यास १२ तासांनंतर तुम्हाला पचनासंबंधित त्रास दूर झाल्याचा अनुभव येईल.२) तुमचे शरीर फळांमध्ये असलेले पोषक घटकांचे पचन करून आणि शोषून घेण्यास सुरुवात करील; ज्यामुळे पोटासंबंधित आजारापासून आराम मिळेल. जसे की, पोटदुखी आणि पोट फुगणे.३) २४ तासांनंतर शरीरातील नको असलेले फॅट्स बर्न होण्यास सुरुवात होईल.४) तुमचे शरीर पौष्टिक केटोसिसच्या अवस्थेत प्रवेश करील म्हणजे ते संचयित चरबीचा ऊर्जास्रोत म्हणून वापर करण्यास सुरुवात करील. पण, अशा प्रकारच्या डाएटचा तुम्हाला खरेच फायदा होतो का? याविषयी खाली डॉक्टरांनी आपली मते दिली आहेत. ७२ तास फळांवर राहणे खरेच फायदेशीर ठरते का? डॉ. पंकज वर्मा यांच्या माहितीनुसार, ७२ तास फक्त फळांचे सेवन केल्याने तुमच्या शरीरावर सकारात्मक आणि नकारात्मक दोन्ही परिणाम होऊ शकतात. सकारात्मक बाजूने विचार केल्यास फळांमध्ये भरपूर जीवनसत्त्वे, खनिजे, अँटिऑक्सिडंट्स व फायबर्स असतात, जे सुधारित पचन, ऊर्जा पातळी वाढवण्यास व तुमची रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी मदत करतात. फळांमधील पाण्याचे प्रमाण जास्त असल्याने शरीर हायड्रेशन ठेवण्यास मदत होते.पण फळांचे योग्य प्रमाणात सेवन करणे आवश्यक आहे. कारण– केवळ फळांवर अवलंबून राहिल्याने विविध आरोग्यविषयक समस्या उद्‌भवण्याचा धोका वाढू शकतो, असे योगसूत्र होलिस्टिक लिव्हिंगच्या संस्थापक शिवानी बाजवा यांनी सांगितले.आहारात केवळ फळांचा समावेश केल्यास शरीरास आवश्यक प्रथिने, चरबी, विशिष्ट जीवनसत्त्वे व खनिजे यांसारख्या आवश्यक पोषक घटकांची कमतरता जाणवू शकते. डॉ. वर्मा यांच्या माहितीनुसार, स्नायूंच्या मजबूतीसाठी प्रोटीन्सची खूप गरज असते, तर हार्मोन्स आणि विविध शारीरिक कार्यांसाठी फॅट्सची आवश्यकता असते. पण, शरीरास ठरावीक कालावधीत योग्य पोषक घटक न मिळल्यास स्नायूंचे नुकसान होऊ शकते. तसेच तुम्हाला थकवा जाणवू शकतो.फळांमध्ये नैसर्गिक साखरेचे प्रमाण जास्त असल्यामुळे रक्तातील साखरेच्या पातळीत चढ–उतार होऊ शकतात. त्यामुळे उर्जा वाढूही शकते किंवा कमीही होऊ शकते; ज्यामुळे चिडचिडेपणा वाढतो आणि एकाग्रता कमी होऊ शकते, असेही डॉ. वर्मा म्हणाले.आहारात केवळ फळांचा समावेश केल्यास उद्‌भवणारे संभाव्य धोके वजन वाढणे काहींना सुरुवातीला वजन कमी होत असल्याचे जाणवू शकते; पण फळांमधील नैसर्गिक साखर वजन वाढवण्यास कारणीभूत ठरू शकते. विशेषत: फळांचे मोठ्या प्रमाणात सेवन केल्यास हा धोका अधिक वाढतो. मधुमेहाची चिंता मधुमेह असणाऱ्या व्यक्तींनी आहारात फळांचा समावेश केल्यास सावधगिरी बाळगली पाहिजे. कारण– त्यात नैसर्गिक साखरेचे प्रमाण जास्त आहे; ज्यामुळे रक्तातील साखरेच्या पातळीवर विपरीत परिणाम होऊ शकतो. स्वादुपिंड आणि किडनीचे विकार असलेल्यांनाही यामुळे धोका निर्माण होऊ शकतो.दात किडणे फळांमध्ये साखरेचे प्रमाण जास्त असल्याने आणि आंबटपणामुळे दात किडण्याचा धोका वाढतो. संत्र्यासारखी काही फळे दातांचे आरोग्य खराब करू शकतात.पोषक घटकांची कमतरता फ्रुटेरियन आहारामुळे जीवनसत्त्व बी–१२, कॅल्शियम, व्हिटॅमिन डी, आयोडीन व ओमेगा–३ फॅटी अ‍ॅसिड यांसारख्या महत्त्वाच्या पोषक घटकांची कमतरता होऊ शकते. या कमतरतेमुळे अशक्तपणा, थकवा, रोगप्रतिकारक शक्ती बिघडणे व कमी कॅल्शियमच्या बाबतीत ऑस्टिओपोरोसिस होऊ शकते .अशक्तपणा शरीरात आवश्यक जीवनसत्त्वे, चरबी व प्रथिने नसल्यामुळे प्रामुख्याने फळांवर अवलंबून राहिल्याने अशक्तपणा येऊ शकतो. महत्त्वपूर्ण कार्यांसाठी ऊर्जा वाचवण्याच्या प्रयत्नात यामुळे चयापचय क्रिया मंद होऊ शकते.फळांचे सेवन केल्याने तात्पुरते समाधान मिळू शकते; परंतु सतत प्रथिने आणि चरबीच्या कमतरतेमुळे रक्तातील साखरेचे प्रमाण कमी–जास्त होऊ शकते. त्यामुळे लवकरच भूक लागू शकते किंवा खाण्याची लालसा वाढू शकते. फळांचा आहार घेताना त्यातील संभाव्य तोटे टाळण्यासाठी फळांची निवड आणि त्यात विविधता असणे आवश्यक आहे.फळांमध्ये अत्यावश्यक पोषक घटकांचा समावेश असला तरी संपूर्ण आरोग्यासाठी संतुलित आणि वैविध्यपूर्ण आहार महत्त्वाचा असतो. डॉ. बाजवा यांच्या म्हणण्यानुसार, दीर्घकाळपर्यंत फ्रुटेरियन आहार तुमच्या शरीरास आवश्यक पोषक घटक देऊ शकत नाही. त्यामुळे अशा प्रकारचा आहार सुरू करताना आहारतज्ज्ञांचा सल्ला घ्या. कारण– सकस आणि पौष्टिक आहाराचा एक भाग म्हणून फळांचा समावेश करणे हे आरोग्यासाठी फायदेशीर ठरू शकते. अल्प काळासाठी फळांच्या आहाराचे फायदे मिळू शकतात. परंतु, संतुलित व वैविध्यपूर्ण आहार आपल्या शरीरासाठी फायदेशीर मानला जातो आणि त्यातूनच आपल्या आरोग्यासाठी आवश्यक पोषक घटक पुरवता येतात, असेही डॉ. वर्मा म्हणाले.



## वयानुरुप त्वचेवर सुरकुत्या का येतात?

जससजसे वय वाढते तसतसा मानवाच्या सर्वच अवयवांवर परिणाम होत असतो. फक्त त्वचा आणि चेहरा हे अवयव म्हणजे उघडे पुस्तक असल्यामुळे ते सतत नजरेला दिसत राहतात आणि खटकतात. मग सुरु होते या पाउलखुणा पुसण्याची धडपड. दिवाळीमध्ये सर्व सोशल मीडियावर जाहिरातींचा पूर आलेला असतो. दिवाळी अंक व वर्तमानपत्रे यामधील बऱ्याच जागा कपडे आणि दागदागिन्यांच्या जाहिरातींनी नटलेल्या असतात. माझे असे निरीक्षण आहे की हल्ली जाहिरातींमध्ये जे आजी–आजोबा – बापरे आजी–आजोबा नाही म्हणायचे, तर ज्येष्ठ नागरिक असे म्हणायचे, खरे की नाही? – तर हे जे आजी–आजोबा दिसतात ते किती तरुण आणि सुडौल दिसतात शिवाय तंदुरुस्त देखील. तर हा आहे आजचा जमाना. वाढलेलं वय झाकण्याचा किंवा काळाचे चक्र मागे नेण्याचा. होय ना? आजचा आपला लेख ह्या हौसेबद्दल योग्य ती शास्त्रीय माहिती करून घेण्यासाठी आहे. न्टी–एजिंग म्हणजेच वय पालटताना जे प्रश्न तुम्हाला पडतात त्यांची माहिती देणे हे आजच्या लेखाचे प्रयोजन आहे. जसजसे वय वाढते तसतसा मानवाच्या सर्वच अवयवांवर परिणाम होत असतो. फक्त त्वचा आणि चेहरा हे अवयव म्हणजे उघडे पुस्तक असल्यामुळे ते सतत नजरेला दिसत राहतात आणि खटकतात. मग सुरु होते या पाउलखुणा पुसण्याची धडपड. वयोमानाप्रमाणे हे बदल का बरे घडतात?ढोबळ मानाने या बदलाची दोन कारणे आहेत. ती म्हणजे आंतरिक घटक म्हणजे शरीरात नैसर्गिकरीत्या आतून घडून येणारे बदल. या बदलाचे कारण असते अनुवंशिकता, संप्रेरकांची कमतरता, मानसिक अवस्था आणि त्वचेचा मूळ रंग. कधी कधी आपण भाजीवालीचा काहीही काळजी न घेता दिसणारा सुंदर चेहरा बघतो.. ही असते अनुवंशिक देणगी.दुसरे कारण म्हणजे बाह्य घटकांचा त्वचेवर होणारा परिणाम. यातील प्रमुख घटक म्हणजे सूर्यप्रकाश. सूर्यप्रकाशातील अतिनील किरणे सर्वात धोकादायक असतात. ही किरणे सूर्यप्रकाशाव्यतिरिक्त कंप्युटर किंवा इतर इलेक्ट्रॉनिक साधनांमधूनही फेकली जातात. त्याचबरोबर आगीची धगदेखील हानीकारक असते. वातावरणातील प्रदूषणकारक धूलिकण यामध्ये येतात. तसेच धूम्रपान, वाहनांवाटे बाहेर पडणारी प्रदूषित हवा, फटाक्यांचा धूर, जाळलेला कचरा आणि कारखान्यांमधून सोडला जाणारा धूर. हे बदल कोणते असतात? हे बदल त्वचेच्या सर्वच थरांबरोबर त्यांच्याखालील स्नायू व हाडे यांच्यामध्ये देखील घडून येतात. त्वचेचा सर्वात वरचा थर म्हणजे एपीडर्मीस किंवा बाह्यत्वचा. यात होणारा बदल म्हणजे त्वचा रापणे, तिचा रंग काळपट होणे, ती निस्तेज दिसणे आणि तिच्यावर विविध रंगी डाग किंवा चामखीळ दिसणे. डर्मीस किंवा अंतर्त्वचा म्हणजे एपीडर्मीसच्या खालचा थर. या थरामध्ये वेगवेगळ्या पेशी, प्रथिनांचे तंतू आणि रक्तवाहिन्या असतात.

या थरातील फायब्रोब्लास्ट या पेशींचे कार्य मंदावते. त्यांची जननक्षमता कमी होते. त्यामुळे कोलॅजेन आणि इलास्टिन हे प्रथिनतंतू कमी प्रमाणात तयार होतात. त्यामुळे त्वचेचा भरीवपणा आणि लवचिकता कमी होते. मग चेहऱ्यावर सुरकुत्या दिसू लागतात. ओपन पोअर्स म्हणजे त्वचेतील रंध्रे मोठी होऊन खड्डे दिसू लागतात. आंतरिक वार्धक्यामुळे पडणाऱ्या सुरकुत्या अतिशय बारीक असतात. त्या गोऱ्या त्वचेवर अधिक प्रमाणात आणि लहान वयात दिसण्यात येतात तर बाह्य वार्धक्याच्या सुरकुत्या मोठ्या व जाड असतात. या बदलांमुळे त्वचेचा मुलायमपणा, लवचिकता आणि गुळगुळीतपणा कमी होऊ लागतो. जखमा सहज होतात आणि लवकर बऱ्या होत नाहीत. त्वचा जाडसर, फिकट,निस्तेज आणि पिवळट दिसू लागते. तसेच कोलॅजेन आणि इलास्टिन प्रथिनतंतू कमी झाल्यामुळे अंतर्त्वचेतील रक्तवाहिन्यांचा आधार कमजोर होतो व जरासे लागले तरी त्वचेखाली रक्त जमा होते.



## ओबीसी मेळाव्यानंतरच दमानियांचा आरोप; समीर भुजबळ यांचा खुलासा

राज्यात मराठा विरुद्ध ओबीसी वातावरण तापलेले असताना ओबीसींच्या मेळाव्यानंतरच अंजली दमानिया यांनी भुजबळ कुटुंबावर राजकीय हेतूने प्रेरित होऊन आरोप केल्याचा पलटवार माजी खासदार समीर भुजबळ यांनी केला आहे.मुंबईतील जमीन खरेदीत फर्नांडिस कुटुंबीयांनी त्यांच्या राजकारणाला बळी पडू नये, असे आवाहन त्यांनी केले आहे. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केलेल्या आरोपांबाबत खुलासा करण्यासाठी रविवारी (ता. १९) समीर भुजबळ यांनी माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले, की मुंबईतील बॉम्बे ख्रिश्चन ट्रस्टच्या मालकीची जागा फ्रान्सिस फर्नांडिस हे लीज होल्डर म्हणजे मालक असताना खरेदी केली.या प्रकरणी कोर्टात फर्नांडिस कुटुंबीयांनी १९९४ मध्ये कन्सेंट टर्म्स फाईल करून सर्वप्रथम मेसर्स पाल्म शेल्टर्स या रहेजा बंधूंच्या कंपनीबरोबर व्यवहार केला होता. त्यांनी १० वर्षे काहीही काम न केल्याने श्री. व सौ. फर्नांडिस हे नव्या डेव्हलपर्सच्या शोधात असताना फ्रेडरिक नर्होणा या सोसायटीच्या सचिवांनी आमच्या मेसर्स परवेश कन्स्ट्रक्शन या कंपनीला ती जागा विकसित करण्यासाठी दिली.त्यानुसार रहेजा बंधूंच्या कंपनीबरोबर सर्व कायदेशीर व्यवहार पूर्ण करून व श्री. व सौ. फर्नांडिस यांच्या सहमतीने नर्होणा यांच्या कंपनीशी करार करून फर्नांडिस कुटुंबीयांना त्याच सोसायटीत इतरत्र बांधकाम सुरू असलेल्या इमारतीत फ्लॅट देण्याचे ठरले होते. तसा करार करूनच ही जागा विकसित केल्याचे त्यांनी सांगितले.मुळात फर्नांडिस कुटुंबीयांना पैसे देण्याची जबाबदारी रहेजा व नर्होणा यांच्यावर आहे. अशा परिस्थितीत त्यांच्या कुटुंबीयांचा आम्ही सहानुभूतीपूर्वक विचार करून मदत देऊ करीत आहोत. मात्र, दमानिया त्यांचा राजकारणासाठी वापर करीत आहेत. त्यांनी केलेले आरोप हे भुजबळ कुटुंबीयांना बदनाम करण्यासाठीच असून, वेळ पडली तर त्यांच्याविरोधात न्यायालयात जाण्याची तयारीही आहे, असेही समीर भुजबळ यांनी सांगितले.खासदार सुळे यांची मध्यस्थी अंजली दमानिया यांनी खासदार सुप्रिया सुळे यांच्याशी संपर्क साधल्यावर फर्नांडिस कुटुंबीयांना सहानुभूती म्हणून ५० लाखांचा धनादेश दिला. पण, त्यांनी तो बँकेत वटविला नाही. सध्या ही मिळकत ‘ईडी’कडे असल्याचेही समीर भुजबळ यांनी सांगितले.



## मोदींचा एक कॉल अन..; बोगद्यात अडकलेल्यांसाठी युद्धपातळीवर प्रयत्न! जाणून घ्या कुठवर आले मदतकार्य



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांना फोन करून उत्तरकाशीतील सिल्क्यराजवळ बोगद्यात अडकलेल्या कामगारांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यासाठी सुरू असलेल्या मदत आणि बचाव कार्याची माहिती घेतली आहे. पंतप्रधान मोदी म्हणाले की, केंद्र सरकारकडून आवश्यक बचाव उपकरणे आणि संसाधने पुरविली जात आहेत. केंद्र आणि राज्य संस्थांच्या परस्पर समन्वयाने कामगारांना सुरक्षितपणे बाहेर काढले जाईल. अडकलेल्या कामगारांचे मनोधैर्य राखण्याची गरज आहे.सद्यस्थितीची माहिती देताना मुख्यमंत्री म्हणाले की, राज्य आणि केंद्रीय यंत्रणा परस्पर समन्वयाने आणि तत्परतेने मदत आणि बचाव कार्यात व्यस्त आहेत. बोगद्यात अडकलेले कामगार सुरक्षित असून ऑक्सिजन, पौष्टिक अन्न आणि पाणी पुरवले जात आहे. तज्ज्ञांचे मत घेऊन एजन्सी मदत आणि बचाव कार्य करत आहेत.मुख्यमंत्री पुष्कर धामी यांनी सांगितले की, त्यांनी स्वतः घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली असून ते बचाव कार्यावर सतत लक्ष ठेवून आहे. तेथे वैद्यकीय पथकही तैनात करण्यात आले आहे. बोगद्यात अडकलेले सर्व कामगार सुखरूप असून त्यांना लवकर बाहेर काढण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जात असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. आत्तापर्यंत पंतप्रधानांनी मुख्यमंत्र्यांकडून तीन वेळा परिस्थितीची माहिती घेतली आहे. पीएमओ टीमनेही घटनास्थळाची पाहणी केली असून ते सतत परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे आणि समन्वयाचे काम करत आहे.अडकलेल्या कामगारांचे आणि त्यांच्या कुटुंबीयांचे मनोधैर्य टिकवून ठेवण्यासाठी आणि त्यांच्याशी सतत संवाद साधून त्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी मानसोपचार तज्ज्ञांमार्फत समुपदेशनाची व्यवस्था करण्याच्या सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. येथे येऊ इच्छिणाऱ्या कामगारांच्या कुटुंबाचा वाहतूक, भोजन, निवास आणि मोबाईल रिचार्जचा खर्च उत्तराखंड सरकार उचलणार आहे. या आपत्तीच्या काळात आपण सर्वांनी कामगार आणि त्यांच्या कुटुंबियांचे मनोबल जपले पाहिजे.मुख्यमंत्री धामी म्हणाले की, बोगद्यात अडकलेल्या कामगारांना सुरक्षितपणे बाहेर काढणे हे केंद्र आणि राज्य सरकारचे सर्वोच्च प्राधान्य आहे, ज्याचा पंतप्रधान कार्यालयाकडून आढावा घेतला जात आहे. बोगद्याच्या दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर उत्तराखंडमधील राज्य सरकारच्या बोगदा प्रकल्पांचा आढावा घेतला जाईल, असा पुनरुच्चार त्यांनी यावेळी केला आहे.

ड्रिल दोन ते तीन दिवसांत होऊ शकते

# वंचित बहुजन आघाडी नवी मुंबई नेरूळ विभाग जनसंपर्क कार्यालयाचे उत्साहात उदघाटन

नवी मुंबई / के. एच. हनवते:- वंचित बहुजन अघाडी नवी मुंबई नेरूळ विभाग जनसंपर्क कार्यालयाचे भव्य दिव्य उद्घाटन वंचित बहुजन अघाडी महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष आनिल (आण्णा) जाधव यांच्या शुभ हस्ते करण्यात आले. त्यावेळी अनिल अण्णा जाधव यांनी उपस्थितांना शुभेच्छा पर आपले मनोगत वेक्त करतांना जाहीर अव्हाण केली की, दिनांक : २५ नोव्हेंबर २०२३ रोजी सायं. ५ वाजता छ. शिवाजी महाराज पार्क दादर मुंबई येथील क्रांतीकारी मैदानावर वंचित बहुजन अघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांच्या मार्गदर्शना खाली संविधान के सन्मान मे हम सब मैदान मे. ! संविधान सन्मान महारॅलीचे भव्य दिव्य आयोजन करण्यात आले आहे तरी समस्त वंचित बहुजन समाजाने या जाहीर सभेत तन मन धनाने सहकार्य करावे व लाखोंच्या संख्येत आपण सर्वानी उपस्थित राहून मिशन २०२४ चा संकल्प करायचा आहे. चलो संसद भवन ! चलो विधान भवन !! गौत्तम की जमीन युं ही विरान होने नही देंगे और भारत मे दुसरा संविधान हरगीज बनने नही दंगे और लागु होणे नही देंगे..! त्यावेळी नवी मुंबई परिसरातील तसेच पनवेल, कामोटे येथील पदाधिकारी कार्यकर्ते व असंख्य महिलांनी कार्यक्रम स्थळी उपस्थित राहून संविधान के सन्मान मे हम सब मैदान मे चा एकच जल्लोष केला. या वेळी आजी माजी पदाधिकारी यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली. या कार्यक्रमास मोलाचे आसे सहकार्य हेमलताताई उके ( महिला उपाध्यक्ष नवी मुंबई ), ज्योतीताई उबाळे ( महिला उपाध्यक्ष नवी मुंबई ), तसेच गौतम चव्हाण (ऊपाध्यक्ष नवी मुंबई शहर ), रोहित लोखंडे (उपाध्यक्ष नवी मुंबई शहर), यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. त्या वेळी या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती भुषण कासारे (





नवी मुंबई महानगर शहर अध्यक्ष), शिल्पाताई रणदिवे (महिला जिल्हा अध्यक्ष), अँड. संदेश मोरे साहेब (मुंबई हायकोर्ट), नितिन भाऊ गोरे (वंचित बहुजन अघाडी युनियन कामगार नवी मुंबई जिल्हाध्यक्ष), सीमाताई रणदिवे (महीला उपाध्यक्ष युनियन कामगार), डि. डि. गायकवाड (वंचित बहुजन अघाडी पनवेल महानगर शहर अध्यक्ष) सह आनेक पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. कामोटे येथील वंचित बहुजन अघाडीचे धडाडीचे कार्यकर्ते सारंग आंभोरे, बाजीराव धुळे, ए. के. शर्माजी, वंचित बहुजन अघाडी तुर्भे नवी मुंबई राजेंद्र बनसोडे ( जेष्ठ साहित्येक ), वंचित बहुजन अघाडी बेलापूर तालुक्यातील माजी पदाधीकारी - राहुल जाधव, राहूल शिरसाट, कल्याणराव हनवते, अशोक मनवर, युवा कार्यकर्ता सुभाष बलखंडे, ऐरोली विभाग युवा कार्यकर्ता अश्वजीत जगताप, तुर्भे विभाग संजय जवादे (उपाध्यक्ष नवी मुंबई शहर), सुनिल साबळे (वंचित बहुजन दिव्यांग आघाडी नवी मुंबई जिल्हा अध्यक्ष), शंकर बनसोडे माजी सहसचिव बेलापूर तालुका, अंकुश गायकवाड उपाध्यक्ष नवी मुंबई शहर, अशोक सिरसाट (वंचित बहुजन माथाडी ट्रान्सपोर्ट युनियन कामगार संघना माजी सहसचिव), व तसेच भारतीय बौद्ध महासभा नवी मुंबई महीला जिल्हाध्यक्ष शोभाताई कांबळे, केंद्रीय शिक्षीका अल्काताई अढाव, आनंद बोधी निकाळजे गुरूजी, इत्यादी कार्यकर्त्यांनी उपस्थित राहून कार्यक्रमास शोभा वाढवली व शेवटी अल्पोहार वाटप करून कार्यक्रम संपन्न केला.

# खरोसा येथे दुसर्या अखिल भारतीय बौद्ध धम्म परीषदेचे आयोजन ....

औसा :- खरोसा येथे दुसर्या अखिल भारतीय बौद्ध धम्म परीषदेचे आयोजन .. गेल्या दहा वर्षापुर्वी खरोसा येथील बुद्धलेणी येथे पहिले अखील भारतीय बौद्ध धम्म परीषद साजरी करण्यात आली होती . बौद्ध धम्म विकास प्रतिष्ठाण बुद्धलेणी खरोसा च्या अध्यक्षा उपासीका सत्यभामा बळीराम रोंगे यांच्या सुसज्य संकल्पनेतुन ३ डीसेंबर २०२३ रोजी खरोसा येथे दुसरी अखिल भारतीय बौद्ध धम्म परीषद साजरी होणार असुन या बौद्ध धम्म परीषदेला सर्व श्रद्धा संपन्न बौद्ध उपासक / उपासिकांना बुद्ध जयंती निमीत्त आयोजीत बुद्धलेणी खरोसा येथे धम्म परीषद व धम्मदेसना कार्यक्रमाचा लाभ घ्यावा अस आवाहन उपासिका सत्यभामा रोंगे व रोंगे परीवारांच्या वतिने आवाहन करण्यात येत आहे .खरोसा येथील धम्म परीषदेला क्रीडा युवक कल्यान व बंदरे विकास मंत्री संजयजी बनसोडे .लातुरचे मा.पालकमंत्री तथा आ.अमित विलासराव देशमुख .लातुरचे खासदार सुधाकरराव श्रंगारे .धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर.मा. पालकमंत्री तथा निलंगा आ.संभाजीराव पाटील निलंगेकर .औशाचे आ.अभिमन्यु पवार .लातुर ग्रामिनचे आ.धिरजभैया देशमुख.अंबरनाथचे आ.बालाजीराव किनीकर ,लातुरचे जिल्हाधिकारी वर्षाताई ठाकुर -घुगे .औशाचे मा.नगराध्यक्ष अफसर शेख .महाराष्ट्र काँग्रेसचे सरचिटणीस अभय साळुंके.काँग्रेस सरचिटणीस अमरजी खानापुरे .खरोसा सरपंच पुष्पा डोके.बौद्ध



महासभेचे जिल्हाध्यक्ष मच्छींद्र वलांडे. तालुकाध्यक्ष धम्मदिप डांगे.यांच्या प्रमुख उपस्थितीत ही धम्म परीषद साजरी होणार असुन .दुसरी अखिल भारतीय बौद्ध धम्म परीषदेत प्रमुख धम्मदेसना देणारे .अहमदपुरचे भिक्खु महाविरो थेरो. लातुरचे भिक्खु पय्यानंद थेरो .बीडचे भिक्खु धम्मशिल थेरो.उदगीरचे भिक्खु नागसेन बोधी थेरो.बुद्धलेणी खरोसाचे भिक्खु सुमेधजी नागसेन .किल्लारीचे भिक्खु धम्मसार.उमरग्याचे भिक्खु सुमंगल ..पानगावचे भिक्खु धम्मबोधी .लातुरचे भिक्खु धम्मशिल ..काळेगावचे श्रामणेर राहुल .काळेगावचे श्रामणेर सोनुत्तर यांच्या सुश्राव्य वाणीतुन धम्मदेसना घेता येनार आहे .तर या धम्म परीषदेसाठी प्रमुख पाहुणे मनुन नागसेन माने लालासाहेब कांबळे डॉ प्रकाश गायकवाड बंडू पाडुळे युवराज गायकवाड महेश पाटोदकर मनोहर गवळे संजय सोनकांबळे श्रीशैल्य उटगे प्रा भिमराव चक्रे भरत सूर्यवंशी हिराचंद गायकवाड राजेंद्र बनसोडे नितीन गायकवाड आशिष बनसोडे विजय कांबळे धनराज डोळसे लिंबराज कांबळे चंद्रकांत जी चिकटे प्रा अनंत लांडगे अशोक कांबळे मोहन माने, बालाजी कांबळे अंकुश ढाकरे संतोष आप्पा मुक्ता गोविंद जाधव बाबासाहेब गायकवाड लक्ष्मण कांबळे धम्मदीप जाधव शरद बनसोडे राजाराम साबळे प्रदीप कावळे युवराज कांबळे अशोक बनसोडे डॉक्टर सिताराम सोनवणे ईश्वर आवचारे अण्णासाहेब सुरवसे अमर लांडगे जनार्दन कांबळे राजूभाऊ शिखरे श्रावण सुरवसे राजेंद्र अवचारे राहुल जाधव भैरू सूर्यगंध शेषराव गायकवाड समाधान वाघमारे लखन गायकवाड शिवाजी रंगे राहुल जाधव पुष्पा कांबळे पंडित सूर्यवंशी सह आदी मान्यवर या कार्यक्रमासाठी उपस्थीत असनार आहेत .बुद्धलेणी खरोसा येथील दुसरी अखिल भारतीय बौद्ध परीषदेचे आयोजक व स्वागतोत्सुक उपासिका सत्यभामा बळीराम रोंगे,उपा. अतुल व्यंकटराव कांबळे .उपा बाळासाहेब बळीराम रोंगे उपा भैयासाहेब बळीराम रोंगे हे असुन या धम्म परीषदेसाठी महाभोजनदान समता परीषदेचे लातुर जिल्हा संघटक नागोराव माळी यांनी दिले आहे.....

# प्रधानमंत्री पिक विमा योजनेमध्ये शेतकऱ्यांचे अर्ज रद्द करण्यात येऊ नये.. शिवसेना सहसंपर्कप्रमुख संतोष भाऊ सोमवंशी

लातूर :लातूर जिल्हात प्रधानमंत्री पीक विमा योजनेमध्ये शेतकऱ्यांचे अर्ज रद्द करण्यात येऊ नये अशी मागणी महाराष्ट्र राज्य बाजार समिती संघाचे उपसभापती तथा सहसंपर्कप्रमुख संतोष भाऊ सोमवंशी यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री, कृषी मंत्री, जिल्हाधिकारी यांच्या कडे केली आहे प्रधानमंत्री पिक विमा योजना शेतकऱ्यांना नुकसानी पासून वाचवण्यासाठी व शेतकऱ्यांच्या जीवनमान उंचावण्यासाठी राज्य शासनाने सध्याची शेतकऱ्यांची परिस्थिती लक्षात घेऊन प्रधानमंत्री पिक विमा योजना ही एक रुपयांमध्ये लागू केली परंतु आपल्या जिल्ह्यातील एसबीआय जनरल इन्शुरन्स कंपनीने अनेक शेतकऱ्यांचे अर्ज रिटर्न केले आहेत त्यामध्ये शेतकऱ्यांना सातबारा व्हेरिफाय केलेला किंवा तलाठ्याचा नसल्यामुळे रिटर्न केला आहे. असे एस एम एस शेतकऱ्यांच्या मोबाइल वर येत आहेत. सातबारा साठी शेतकऱ्यांना शंभर रुपये व व व्हेरिफाय सातबारा साठी पन्नास रुपये अशी किंमत मोजावी लागते प्रधानमंत्री पिक विमा



योजनेच्या पोर्टलमध्ये सातबारा व्हेरिफाय झाल्याशिवाय पोर्टल पुढे जात नाही व महाभुलेखचा सातबारा शेतकऱ्यांनी जोडला असताना देखील रिटर्न का करण्यात आले यामध्ये अनेक शेतकरी माहिती नसल्यामुळे बाद होऊ शकतात अशी मोठी शक्यता आहे तरी यावरती तात्काळ योग्य ती कारवाई करण्याची यावी व पीक विमा कंपनीला आदेश करण्यात यावा.. पिक विमा योजना एक रुपयांमध्ये आणि सातबारा शंभर रुपये मध्ये .म्हणजे शेतकऱ्यांचे भलं करायचं का इतर कुणाचं भलं करायचं हे नेमकं समजत नाही.एस बी आय जनरल इन्शुरन्स कंपनीचा हेतू सरळ सरळ शेतकरी बाद करण्याचा यातून दिसतो हे लक्षात येते.. यावरती योग्य ती कारवाई करावी व सर्व विमा भरलेल्या शेतकऱ्यांना विम्याचा लाभ द्यावा अशी मागणी महाराष्ट्र राज्य बाजार समिती संघाचे उपसभापती तथा सहसंपर्कप्रमुख संतोष भाऊ सोमवंशी यांनी मुख्यमंत्री, कृषी मंत्री जिल्हाधिकारी यांचे कडे केली आहे

# जरांगे पाटलांसारखं कोणत्याही नेत्याला नाही जमणार

मुंबई : किरण मानेंनी सातारा येथील जरांगेंच्या सभेचा व्हिडीओ शेअर केलाय. या व्हिडीओखाली किरण माने लिहीतात, जरांगे पाटलांची राजधानी साता-यातली सभा राजासारखी झाली देखणी रूबाबदार. मी खेडेगांवात लहानाचा मोठा झालो आहे. राजकीय नेत्यांसाठी सभेला गर्दी जमवणे किती सहजशक्य असते, हे मी डोळ्यांनी पाहिले आहे.कशा जीपा,ट्रक,टेम्पो भरून माणसे सभेला नेली जातात कशा घोषणा दिल्या जातात. त्यानंतरच्या पार्ट्या, दारू सगळे माहित आहे. अशा परिस्थितीत एका सर्वसामान्य माणसाच्या सभेला



उत्स्फूर्तपणे, मनापासून, स्वत:हून घरातनं उठून सभेला जाऊन बसणारी माणसे बघायला मिळताहेत. भर उन्हात, रात्री दोन-दोन वाजेपर्यन्त त्याची वाट पहातात. हे कुठल्याही नेत्याला आजच्या काळात शक्य नाही.किरण माने पुढे लिहीतात, मी सातारचं जरांगे पाटलांचं भाषण पूर्ण ऐकलं. जेवढ्या तळमळीनं लोक येतात, तेवढ्याच मनापासून, नितळ, स्पष्ट, परखड, सडेतोड बोलणारा आणि वागणारा हा माणूस आहे. आरक्षणाविषयी सगळी कायदेशीर माहीती आहे. आरक्षणाचा लाभ घेर्णाया इतर वर्गांविषयी जराही कटुता त्यांच्या मनात नाही. द्वेषभावना न पसरवता, मनातून आपण सगळे जातीधर्माचे लोक एक आहोत असा सूर भाषणात असतो, जो आश्वासक आहे.

# हिंगोली येथे होणाऱ्या ओबीसी एल्गार मेळाव्यास मोठ्या संख्येने सहभागी व्हावे - ओबीसी जनमोर्चाचे प्रदेशाध्यक्ष प्रकाशअण्णा शेंडगे



लातूर (प्रतिनिधी )-हिंगोली येथे दिनांक २६ नोव्हेंबर रोजी रामलीला मैदानावर ओबीसी,भटके विमुक्त, बलुतेदार एल्गार मेळावा आयोजित करण्यात आला असून या मेळाव्यास ओबीसी, भटके विमुक्त, बलुतेदार यांनी सहभागी व्हावे असे आवाहन रामचंद्र बलदवा सभागृह ज्ञानेश्वर विद्यालय शाहू चौक येथे आयोजित करण्यात आलेल्या ओबीसी एल्गार बैठकीत ओबीसी जन मोर्च्याचे प्रदेशाध्यक्ष प्रकाशअण्णा शेंडगे यांनी आवाहन केले आहे.

या वेळी लक्ष्मण गायकवाड,प्रा .टि. पी.मुंडे ,चंद्रकांत बावकर, मच्छिद्र भोसले, अहमदपुरचे माजी आमदार बब्रुवान खंदाडे, अनंत चौधरी,ओबीसी नेते अँड.गोपाळ बुरबुरे यांनीही समयोचित विचार मांडले. या बैठकीचे निमंत्रक राजेंद्र वनारसे प्रास्ताविक केले व संयोजक हरिभाऊ गायकवाड यांनी मुख्य उद्देश विषद केला.आदिवासी नेते रामराजे आत्राम यांनी सुत्रसंचलन केले. मकबुल वलांडीकर यांनी आभार मानले.

रामचंद्र बलदवा सभागृह ज्ञानेश्वर विद्यालय येथे आयोजित करण्यात आलेल्या बैठकीस विमुक्त भटक्यांचे युवा नेते प्रमोद गायकवाड,विकास गायकवाड, ओबीसी नेते लक्ष्मण पोटे, शामराव धुर्वे,सौ. सरस्वती जाधव,सुमनश्री राठोड,किरण गायकवाड,अरूण,दिपक,गणेश गायकवाड,यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.गंगाधर जाधव गुरुजी,बबन जाधव,अर्जुन कतारी,विजय जाधव,लक्ष्मण ईटकर,मारूती झाकणे आदीसह ओबीसी,भटके विमुक्त, बलुतेदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लातूर शहरात सामूहिक महा बुद्ध वंदना कार्यक्रमाचे आयोजन

**०६ डिसेंबर २०२३ रोजी स. ०७:३० वा. डॉ. बाबासाहेब पार्क, लातूर येथे उपस्थित राहण्याचे सुकाणू समितीचे आवाहन**

लातूर :- भारताचा कोहीनूर हीरा, केवळ भारतरत्नच नव्हे तर विश्वरत्न, विश्वभूषण, विश्ववंदनीय स्वतंत्र भारताचे पहिले कायदेमंत्री, बहुजनांचे कैवारी, भारतीय संविधानाचे शिल्पकार, आपले मुक्तीदाते, महामानव, परमपुज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे ०६ डिसेंबर १९५६ रोजी महापरिनिर्वाण झाले होते. हे महापरिनिर्वाण म्हणजे बहुजनांचे प्राणवायू निघून जाणेच होय त्यामुळे त्या महापरिनिर्वाण घटनेस ६७ वर्ष पूर्ण होत आहे. तेव्हा समस्त लातूरकरांच्यावतीने पूज्य भिक्खू पय्यानंद थेरो यांच्या मार्गदर्शनाखाली सामुदायिक महाबुध्दवंदनाद्वारे अभिवादन करण्यात येणार आहे.



या कार्यक्रमाला सर्व लातुरकरांनी स्वतः व आपल्या कुटुंबासमवेत दि. ०६ डिसेंबर २०२३ रोजी बुधवार सकाळी ठीक ०७:३० वा. डॉ. बाबासाहेब पार्क, लातूर येथे पांढरे शुभ्र वस्त्र परिधान करुन उपस्थित रहावे असे आवाहन सामूहिक महावंदना अभिवादन कार्यक्रम सुकाणू समितीने केले आहे.

तसेच येताना सोबत गरजवंत विध्यार्थ्याकरीता पेन आणि वही सोबत आणावी. हा कार्यक्रम यशस्वी करण्याकरीता सर्व समाज बांधवांनी आपआपल्या परिसरात, नगरात, चौकात, बुध्द विहारात, सभागृहातील वंदना महाबुध्दवंदने म्हणजे स. १०.०० नंतर आयोजीत करावी.

पानगाव चैत्यस्मारकास अभिवादनासाठी जाणाऱ्यांनी सकाळचा सामूहिक महा बुध्द वंदना कार्यक्रम करुन दुपार नंतर जावे. महाबुध्द वंदना यशस्वी करण्यासाठी प्रत्येकाने आपले कुंटुंब आपली जबाबदारी याप्रमाणे कुंटुंबासहीत उपस्थित रहावे. घरी कुणीही थांबू नये. तसेच शासकीय कर्मचारी यांनी बुधवारी वर्किंग डे असला तरी सकाळी लवकर कार्यक्रमाला उपस्थिती राहून नंतर आपल्या कर्तव्यावर जावे अशी ही विनंती करण्यात येत आहे. त्या सोबतच सर्वांनी या सामाजिक कार्यक्रमाचे स्वतःहून प्रचारक व्हावे. विशेषतः तरुण युवा वर्गाने पुढे येऊन सोशल माध्यमातून प्रचार करावा व शहरात किंवा गाव भागात केवळ तथागत भगवान बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे इच्छुकांनी आपले फोटो न टाकता केवळ नाव टाकूनच बँनर्स लावावेत. या कार्यक्रमास तन- मन - धनाने सहकार्य सर्वांनी करावे. अशी विनंती सामूहिक महाबुद्ध वंदना अभिवादन कार्यक्रम सुकाणू समितीने केली आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE